# ई - पोलीस पत्रिका

दि २४/०६/२०२२ अनु.क्र. ११७

## (अमरावती शहर पोलीसांची २०२२ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू .

## भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

**१.पोआअ/आस्था-वेनिली/नि.व सेवानिवृत्त/६६३६/२०२२.दि.२४/०६/२०२२.**

## आदेश

**संदर्भ** - १) या कार्यालयाची निर्गमित केलेली अधिसुचना जा.क्र.पोआअ/आस्था/पोशि ते सपोउपनि /६१९० दि.९/८/२०१९.

२) या कार्यालयाचे अधीसुचना क्र.पोआअ/आस्था-वेनिली/नि.व सेवानिवृत्त/८२८६/२०२२.

पोलीस आयुक्त,अमरावती शहर,आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे वयाची ५८ वर्षे पुर्ण झाल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्ती वेतन) नियम १०आणि महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक-सेनिवे/१०९९/३४/सेवा-४, दिनांक-०२/०२/१९९९ अन्वये दि.३०/०६/२०२२ चे मध्यान्होत्तर पासूननियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यात येत आहे.

| अ.क्र | अंमलदाराचे नाव,पदनाम,ब.न. | नेमणुक | जन्म दिनांक | वयाची ५८ वर्ष पुर्ण केलल्याचा दिनांक | नियत वयोमान सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.प्रदीप बुडा जावरकर,सपोनि/६३१ | पोलीस मुख्यालय | २२/०६/१९६४ | २२/०६/२०२२ | ३०/०६/२०२२ |
| २. | श्री.बाबासाहेब अहमदसाहेब,सपोउपनि,३४१ | पोलीस मुख्यालय | १०/०६/१९६४ | १०/०६/२०२२ | ३०/०६/२०२२ |
| ३. | श्री.हरीदास राजाराम ईसळ,सपोउपनि/९८ | दंगल नियंत्रण पथक | ०१/०७/१९६४ | ०१/०७/२०२२ | ३०/०६/२०२२ नियम १० टिप १ नुसार |
| ४. | श्री.देवानंद वामनराव बाजड,सपोउपनि/७४७ | गुन्हे शाखा | ०१/०७/१९६४ | ०१/०७/२०२२ | ३०/०६/२०२२ नियम १० टिप १ नुसार |
| ५. | श्री.प्रशांत रामेश्वर बांबील,पोना/१०४८ | शहर वाहतुक शाखा(पश्चिम | ०१/०७/१९६४ | ०१/०७/२०२२ | ३०/०६/२०२२ नियम १० टिप १ नुसार |

**२.पोआअ/विचौ-२/गैरहजर कालावधी/सपोउपनि-६१८/६७३०/२०२२दि.२४/०६/२०२२.**

**<u>आदेश</u>**

खालील नमुद पोलीस अमंलदार हे पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन दिनांक ०६/०५/२०२२ पासुन ते दिनांक ०६/०६/२०२२ पर्यत एकुण ३२ दिवस वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असुन आपणास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन व भविष्याचा विचार करुन सदरचा गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ५१ चे तरतुदीनुसार **<u>अर्जित रजेमध्ये मंजुर</u>** करण्यात येत आहे. **<u>तसेच</u>** आपणास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **<u>"सक्त ताकीद"</u>** ही शिक्षा देण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | सपोउपनि/६१८ सुरेंद्र ढोके | पो.मुख्या अम.शहर | दिनांक ०६/०५/२०२२ पासुन ते दिनांक ०६/०६/२०२२ पर्यत कर्तव्यावर अनाधिकृतपणे गैरहजर होते. | दिनांक ०६/०५/२०२२ पासुन ते दिनांक ०६/०६/२०२२ पर्यत एकुण ३२ दिवस गैरहजर राहिले. | **३२ दिवस अर्जित रजा** |

**३.पोआअ/लेखा/मोसाअ-व्याज/ /२०२२ दि.२४/०६/२०२२.**

**संदर्भ-१.**शानि.वित्त विभाग क्र.धबाअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम दि.२०/०२/२०१५.

**२.**मा.पोलीस महासंचालक,म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्र.पोमसं/३१/शासकीय अग्रीम/१८५/१६ दि.०१/०२/२०१७

विषय - मोटर सायकल अग्रीम व्याज कपात करणेबाबत.

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये खालीलप्रमाणे नमुद पोलीस अमंलदार यांचे विनंती अर्ज या कार्यालयास प्राप्त असून त्यानुसार त्यांचे वेतनपटाची पाहणी केली असता त्यांनी घेतलेल्या मोटर सायकल अग्रीमाची मुददूल त्याचे वेतनातून कपात झाली असून त्यावरील व्याजाची परिगणना

करण्यात येवून सदर व्याज त्यांचे वेतनातून कपात करणेबाबत विनंती त्यांनी केली आहे.

| अ.क्र. | कर्म-याचाचे नाव व पदनाम,ब.नं. | मंजूर मो.सा.अ रक्कम | व्याजाची रक्कम | माहे०६/२२ पासून कपात करावयाचे हफते |
|---|---|---|---|---|
| १. | पोना/११९२ चेतन गणेशराव पांडे पोस्टे गाडगेनगर | ७०००/- | "**रु.१३३८८** | १३३८x०९<br>१३४६ x०१ |
| २. | सपोउपनि/१११३ नबी हबीब शेख,पोलीस मुख्यालय | ७०००/- | "**रु.१३३८८** | १३३८x०९<br>१३४६ x०१ |

तरी वरीलप्रमाणे नमुद पोलीस अंमलदार यांचे वेतनातून एकुण १० हफत्यात मोटर सायकल अग्रीम व्याजाची रक्कम माहे ०६/२०२२ पासूनचे वेतनातून सुरू करावी.

**४.पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिम आदेश/पोशि-१७३४पारडे/६८९२/२०२२.दि२४/०६/२०२२**

## <u>आदेश</u>

**संदर्भ** :- या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/का.दा.नो/पोशि-१७३४ पारडे/ २४२३/२०२२ अमरावती शहर, दिनांक १४/०३/२०२२

**कसुरदारचे नाव :-** पोशि/१७३४ राजेंद्र पारडे, नेमणुक शहर वाहतुक शाखा (पुर्व), अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही पोशि/१७३४ राजेंद्र पारडे, शहर वाहतुक शाखा (पुर्व), अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन आपले प्रोफशनल स्किल अपग्रेडेशन प्रशिक्षण सत्र क्रं. ०५ करीता, पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला येथे दिनांक ०७/०२/२०२२ पासुन ते दिनांक १९/०२/२०२२ पर्यत एकुण १२ दिवसाचे प्रशिक्षणाकरीता दिनांक ०६/०२/२०२२ रोजी १२.०० वा. रवाना करण्यात आलेले होते. आपण दिनांक १४/०२/२०२२ रोजी रात्री २०.५० वा. मोटार सायकल क्रमांक MH २७ BC ९३८२ आपण व आपल्या पाठीमागे बसलेले पोशि/८९२ प्रदिप मोरे, नेमणुक बुलढाणा आपण दोघ पोना/१३६४ अशपाक गफुर चव्हाण, नेमणुक पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला यांची पोलीस प्रशिक्षण केंद्र अकोला येथे मेन गेटवर डयुटी असतांना त्यांची किंवा सदर वरिष्ठाची परवानगी न घेता परस्पर निघुन गेले व परत आल्यावर आपणास विचारणा केली असता आपण बी.पी. ची गोळी आणने कामी मेडीकल स्टोअरवर गेलो होतो. असे सांगितले तसेच आपल्या गाडीचे डिक्कीमध्ये काय आहे असे विचारले असता आपण चिवडा असलयाबाबत सांगीतले. सदर वेळी आपल्या मोटार सायकलची डिक्की तपासणी केली असता McDowells कंपनीची ७५० ML व्हिस्कीची बाटली व जवळपास ५०० ग्रॅम व शेवचे पाकीट मिळुन

आले असुन असुन आपण आपले कर्तव्यामध्ये हलगर्जीपणा व निष्काळजीपणा करतांना दिसुन आले असुन कर्तव्यात कसुर केला आहे.

अशाप्रकारे आपण शिस्तबध्द पोलीस खात्यात नेमणुकीस असुन सुध्दा आपल्या कर्तव्याप्रती बेशिस्तपणा केल्याचे निदर्शनास आले आहे. या आपल्या बेशिस्तपणाच्या व बेजबाबदारपणाच्या कसुरीबदल आपणास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ पोटनियम (२) (५) चे तरतुदी नुसार देय वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता) का रोखण्यात येवु नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीस तुम्ही दिनांक २१/०३/२०२२ रोजी स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. सादर केलेल्या स्पष्टीकरण्याचे अवलोकन केले असता सादर केलेले स्पष्टीकरण संयुक्ती व समाधानकारक दिसुन आले नाही. तरी यापुढे कर्तव्यात अशाप्रकारे कसुरी होवु नये म्हणुन सुधारण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशतः बदल करुन खालील प्रमाणे शिक्षेबाबत अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

उपरोक्त नमुद कसुरदार यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **"रु.२०००/- दंडाची शिक्षा देण्यात येत आहे. "**

उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यस्थीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

**(के.एल.शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहर करिता

प्रती, पत्रव्यवहार शाखा/ सेवापट नोंदणी लिपीक, आस्थापना शाखा/सीसीटीएनएस